'विशेष पोलिस' तैनात

सील केलेल्या इमारतींवर लक्ष ठेवण्यासाठी सर्वसामान्यांची नेमणूक

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

करोनाच्या वाढत्या संसर्गामुळे निर्माण झालेली चिंताजनक परिस्थिती आणि त्यामुळे येणारा यंत्रणेवरील ताण कमी करण्यासाठी मुंबई पोलिसांनी नामी शक्कल लढवली आहे. बंदोबस्त, नाकाबंदी तसेच, इतर कामांबरोबरच प्रतिबंधित क्षेत्रावर नजर ठेवण्यासाठी मनुष्यबळ वाया जात असल्याने मुंबई पोलिसांनी यासाठी नागरिकांनाच सामावून घेण्यास सुरुवात केली आहे. प्रतिबंधित क्षेत्रातील एखादी स्वच्छ प्रतिमेची, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेली व्यक्ती शोधून तिला 'विशेष पोलिस' म्हणून दर्जा दिला जात आहे. मुंबईतील सुमारे अकराशे जणांना आतापर्यंत विशेषाधिकार देण्यात आले आहेत.

उपायुक्त देतात विशेषाधिकार

महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१चे कलम २१ (१) मध्ये दिलेल्या विशेषाधिकारांतर्गत तसेच, पोलिस आयुक्त, मुंबई यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम १० अन्वये पोलिस उपायुक्त दर्जाचा अधिकारी एखाद्या व्यक्तीला विशेष पोलिस म्हणून नेमतो. महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम २१ (२) (ब) अन्वये पोलिस अधिकाऱ्यास जे अधिकार, कामे व विशेषाधिकार आहेत ते सर्व या व्यक्तीस लागू असतात.

युद्ध, नैसर्गिक आपत्ती किंवा एखादी महामारी अशा आणीबाणीच्या परिस्थितीत सरकारी यंत्रणांवर प्रचंड ताण येतो. करोना संसर्गाच्या महामारीमुळे पूर्ण यंत्रणा कोलमडली असून पोलिसांवरही ताण पडत आहेत. कडक निर्बंधांमध्ये कुणीही नियमभंग करू नये यावर नजर ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणा गेल्या वर्षभरापासून अहोरात्र राबत आहे. कर्तव्य बजावताना सर्वसामान्य नागरिकांशी संपर्क येत असल्याने मुंबईत सुमारे ८ हजार पोलिस करोनाबाधित झाले. ज्या वेगाने संसर्ग होत आहे त्या तुलनेत पोलिसांचे मनुष्यबळ अपुरे पडत आहे. पाचपेक्षा अधिक रुग्ण असलेल्या इमारती, गृहनिर्माण सोसायटी, वैठळा चाळींचा परिसर पालिका सील करत आहे. प्रतिबंधित क्षेत्रातील रहिवाशांकडून नियमांचे उल्लंघन होते का, यावरही पोलिसांचा लक्ष ठेवावे लागते. कामाचा हा भर कमी करण्यासाठी मुंबई पोलिसांनी येथील रहिवाशांनाच यासाठी कामात सहभागी करून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

पोलिस आपल्या हद्दीत येणाऱ्या प्रतिबंधित क्षेत्रातील माहिती घेऊन त्या क्षेत्रातील एखादा शिक्षित रहिवाशी, सोसायटीचे पदाधिकारी किंवा लोकांच्या परिचयात असलेले चेहरा शोधतात. त्या व्यक्तीची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली जाते. विशेषाधिकार दिला जाणारा व्यक्ती गैरफायदा घेणार नाही याबाबत खात्री पटल्यानंतर त्या व्यक्तीला पोलिस विशेषाधिकार दिला जातो. मुंबईत अशाप्रकारे आतापर्यंत अकराशे जणांना विशेष पोलिस म्हणून दर्जा देण्यात आला आहे. प्रतिबंधित क्षेत्रात कुणी नियमभंग करीत असल्यास त्याची समजूत काढणे, तो ऐकत नसल्यास याबाबतची माहिती पोलिसांना देणे आदी जबाबदारी या विशेष पोलिसावर असते.

'कोविन ॲप' अद्ययावत होणार

मुंबई : लसीकरणाचा चौथा टप्पा १ मेपासून सुरू होत असताना कोविन ॲपमध्ये त्यादृष्टीने आवश्यक असे बदल करण्यात येणार आहेत. लसीकरणाच्या पहिल्या दोन टप्प्यांमध्ये ॲपमध्ये नोंदणी करत असताना जो गोंधळ झाला तो टाळण्यासाठी ही काळजी घेण्यात येणार आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांना दिलेल्या नियमावलीमध्ये हे निर्देश दिले आहेत.

या सर्व केंद्रांना लसीकरण झाल्यानंतर डिजिटल प्रमाणपत्र देणे तसेच लसीकरणानंतर उद्भवणाऱ्या दुष्परिणामांची माहिती कोविन ॲपमध्ये नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

प्रत्येक लसीकरण केंद्रावर शीतसाखळी ठेवणे तसेच विश्रांती कक्षांची उपलब्धता, प्रशिक्षित आरोग्य कर्मचाऱ्यांची उपलब्धता तसेच कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम जाणवल्यास तातडीने रुग्णालयामध्ये दाखल करण्यासाठी नियमावली देण्यात आली आहे.

लोककवी हरेंद्र जाधव यांचे वार्धक्याने निधन

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई

ऐक सत्यनारायणाची कथा, तूच सुखकर्ता तूच दुःखहर्ता, आता तरी देवा मला पावशील का अशी असंख्य लोकप्रिय गाणी लिहिणारे लोककवी हरेंद्र जाधव यांचे रविवारी पहाटे नवी मुंबईत सानपाडा येथे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगी तारका जाधव, जावई व नात असा परिवार आहे. भक्तीगीते, भावगीते, भीमगीते, कोळीगीते, लग्नगीते, लावण्या, पोवाडे, लोकनाट्य, कथा असे चौफर लिखाण त्यांनी केले होते.

जाधव यांच्या लेखणीतून उतरलेल्या अनेक गीतांनी लोकप्रियतेचे उच्चांक मोडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या जीवनावर आधारित अनेक गीतेही त्यांनी रचली. पहा पहा मंजुळा हा माझ्या भीमरायाचा मळा, हे खरंच आहे खरं, श्री भीमराव रामजी आंबेडकर ही शाहीर व्हिडिओ उमप यांनी गायलेली गीते आजही लोकप्रिय आहेत. माझ्या नवऱ्याने सोडल्ये दारू, बाय देव पावलाय गो, डोलकरा माझे डोलकरा यांसारखी लोकगीतांच्या बाजाची गीतेही त्यांनी सहज लिहिली.

जाधव यांनी साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, एड्स, दारूबंदी या विषयांवर समाजप्रबोधनात्मक लिखाण केले आहे. आपल्या कार्यातून व लिखाणातून फुले, शाहू, आंबेडकरांची परिवर्तनावादी, क्रांतिवादी चळवळ समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम त्या कलावंतांनी केले त्यामध्ये हरेंद्र जाधव यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सरकार दरबारी मात्र त्यांची उपेक्षा झाली, अशी खंत त्यांच्या चाहत्यांनी व्यक्त केली आहे.

सज्जतेसाठी 'वरुण'

समुद्री युद्धसज्जतेची तयारी असलेल्या 'वरुण-२०२१' या कसरती रविवारपासून अरबी समुद्रात सुरू झाल्या. भारतीय व फ्रान्सच्या युद्धनौका तसेच नौदलाची अन्य युद्धवाहने यांत सहभागी झाली आहेत. मंगळवार, २७ एप्रिलपर्यंत या कसरती चालणार आहेत. भारतीय नौदलाकडून एक विनाशिका, दोन फ्रिगेट, इंधनवाहक युद्धनौका तसेच पाणबुडी, पाणबुडीविरोधी हेलिकॉप्टर, टेहळणी विमाने आदी यात सहभागी झाली आहेत. समुद्रातील हवाई सुरक्षा, पाणबुडीविरोधी कसरती, हवाई मोहिमा, सामरिक संरचना, समुद्री सुरक्षा मोहिमा यांचा सराव भारत व फ्रान्स या दोन्ही देशांचे नौदल करत आहेत.

राज्यात मोफत लसीकरण!

(पान एकवरून)

देण्याचा निर्णय झाला आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी होकार दिला असून, याबाबतची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी पुण्यात दिली आहे. राज्यातील जनतेच्या मोफत लसीकरणासाठी लवकरात लवकर जागतिक निविदा काढण्यात येतील, असे मलिक यांनी आवर्जून सांगितले.

केंद्र सरकारने येत्या एक मेपासून देशभरात १८ वर्षांवरील लोकांना लसीकरण करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे ४५ वर्षांच्या खालील लोकांना केंद्र सरकार लस पुरवठा करणार नाही, हे स्पष्ट दिसत आहे. कोव्हिशिल्ड लस केंद्राला १५० रुपये, राज्याला ४०० रुपये आणि खासगी रुग्णालयांना ६०० रुपये प्रतिलस या दराने उपलब्ध करून देणार आहे. कोव्हॅक्सिनची किंमतही ६०० रुपये राज्यांना आणि १२०० रुपये खासगी रुग्णालयांना जाहीर झाली आहे, असेही मलिक म्हणाले.

गुजरात, राजस्थानमध्येही मोफत लस

१८ ते ४५ वयोगटातील नागरिकांना मोफत लस देण्याचा निर्णय गुजरात व राजस्थान सरकारनेही घेतला आहे. या वयोगटासाठी दीड कोटी लसींची ऑर्डर दिली आहे, अशी माहिती गुजरातचे मुख्यमंत्री विजय रुपानी यांनी रविवारी दिली. यासाठी सीरम इन्स्टिट्युटकडून कोव्हिशिल्डच्या १ कोटी तर भारत बायोटेककडून कोव्हॅक्सिनच्या ५० लाख लसी विकत घेण्यात येणार आहेत. राजस्थाननेही असाच निर्णय घेतला असून यासाठी तीन हजार कोटी रुपये खर्च करण्यात येतील, असे मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनी सांगितले.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

सूचना

(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरणात हस्तांतरण

इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड प्राधिकरण (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या (''नियम'') मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशाचे सलग सात किंवा अधिक वर्ष वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्याचा दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (''आयईपीएफ'') प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमांतील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१२-१३ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक १९ एप्रिल, २०२१ च्या पत्राद्वारे व्यक्तिगततरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर www.ril.com आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना http://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमांनुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्रांऐवजी कंपनी नियमांनुसार आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा ह्या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतींसाठीची योग्य सूचना आहे.

कंपनीला संबंधित भागधारकाकडून २३ जुलै, २०२१ रोजी किंवा तत्पूर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतीनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटिरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यांनी श्री. एस. पी. वेणुगोपाल, जनरल मॅनेजर, केफिन टेक्नॉलॉजीस् प्रायव्हेट लिमिटेड, कंपनीचे रजिस्ट्रार्स आणि ट्रान्सफर एजंट्स यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबोवली, फायनानशियल डिस्ट्रीक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद – ५०० ०३२, दूरध्वनी: + ९१-४०-६७१६ १७००, फॅक्स: + ९१-४०-६७१६ १६८०, टोल फ्री क्र: १८००-४२५-८८९८ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००), ई-मेल: rilinvestor@kfintech.com, वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
के. सेथुरमन
उप कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : २४ एप्रिल, २०२१

www.ril.com

रुग्णालयातील आग; दोघांना अटक

(पान एकवरून)

यांनी सांगितले. आतापर्यंत तपासामध्ये अनेक गोष्टी समोर आल्या असून त्यामध्ये फायर एनओसी मिळणेच ना हरकत प्रमाणपत्राची मुदत मार्च महिन्यातच संपुष्टात आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या प्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे ते म्हणाले.

चौकशी समिती स्थापन

विरार येथील विजय वल्लभ रुग्णालयातील आगीच्या दुर्घटनेकरणी राज्य सरकारमार्फत चौकशी समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे वसई-विरार महापालिकेने सांगितले होते. त्यानुसार पालघरचे जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. तर या समितीमध्ये जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशी, पोलिस आयुक्तालयाच्या परिमंडळ २ चे उपायुक्त संजयकुमार पाटील, वसई-विरार महापालिकेचे आयुक्त गंगाथरन डी., पालिका मुख्य अग्निशमन अधिकारी रिल्पि पालव यांचा समावेश आहे. या समितीला १५ दिवसांत चौकशी करून अहवाल राज्य सरकारला सादर करायचा असल्याचे डॉ. गुरसळ यांनी सांगितले.

ख्याल गायकीचा 'आवाज' हरपला

(पान एकवरून)

ही मुले व मोठा आप्तपरिवार आहे. पं. राजन यांचा जन्म १९५१मध्ये वाराणसी येथे झाला. आजोबांचे भाऊ बडे रामदास मिश्रा आणि वडील हनुमान प्रसाद मिश्रा यांच्याकडून त्यांनी बाल्यावस्थेत संगीताचे धडे घेतले. काका तथा प्रसिद्ध सारंगीवादक गोपाल प्रसाद मिश्रा यांच्याकडूनही त्यांनी गायकीचे धडे गिरवले. ऐंशीच्या दशकात ते दिल्लीत स्थायिक झाले. याच दशकात पं. राजन आणि पं. साजन ही जोडगोळी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात लोकप्रिय होऊ लागली. या जोडीची पहिली आंतराष्ट्रीय मैफल श्रीलंकेत झाली. त्यानंतर कित्तीतरी देशांतील रसिकांनी त्यांच्या मैफलींचा आस्वाद घेतला. २०१८मध्ये त्यांनी पंडित जसराज यांच्यासोबत 'भैरव से भैरवी तक' ही वर्ल्ड टूर केली होती. तीन प्रहरांची ही रागयात्रा रसिकप्रिय ठरली होती.

मोठी हानी : पंतप्रधान

'शास्त्रीय गायनाच्या क्षेत्रात आपली अमीट छाप सोडणाऱ्या पंडित राजन मिश्र यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले आहे. त्यांच्या जाण्याने कला आणि संगीत क्षेत्राची अपरिमित हानी झाली आहे', अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या.

पं. राजन आणि पं. साजन या बंधूद्वयांना १९९८मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला. तत्पूर्वी १९५१मध्ये गंधर्व राष्ट्रीय पुरस्कार, २०१२मध्ये राष्ट्रीय तानसेन पुरस्कार त्यांना मिळाला. २००८मध्ये 'पद्मभूषण'ने सन्मानित करण्यात आले.

कोकणात खाटांची चिंता कायम

(पान एकवरून)

आशा नागरिकांना होती. मात्र रविवारी रांच्याकाठपर्यंत याबाबत प्रशासनाकडून सूचना मिळाली नव्हती.

ग्रामीण रुग्णालयात ऑक्सिजन प्लान्ट

रत्नागिरी जिल्ह्यात रविवारी ६१५ नवे बाधित आढळले असून गेल्या आठवडाभरात जिल्ह्यात करोनारुग्ण आढळण्याचे प्रमाण कमी होताना दिसत नाही. दैनंदिन आकडा साडेपाचशेच्या पुढे जात असल्याने आरोग्ययंत्रणा सतर्क झाली आहे. रत्नागिरी, खेड, चिपळूण, दापोली आदी ग्रामीण रुग्णालयांमध्ये

ऑक्सिजन प्लान्टची उभारणी सुरू झाली असून आठवडाभरात ते कार्यान्वित होतील. सिंधुदुर्ग जिल्ह्यात २३९ नवे बाधित आढळले असून चार जणांचा मृत्यू झाला.

आंबाविक्रेत्यांना दिलासा

कोकणातील एसटी आगारांतून मुंबई-पुण्यातील एसटी आगारांपर्यंत करोनाकाळातही मालवाहतुकीची उत्तम सेवा आजपासून सुरू होत आहे. त्यामुळे आंबा बागायतदारांना कडक संचारबंदीमध्येही आपला माल राज्यातील बाजारपेठांमध्ये पाठवता येणार आहे. शेतकरी ते ग्राहक संकल्पना यशस्वी करण्यासाठी सिंधुदुर्ग, रत्नागिरी एसटी डेपो येथून दरेरोज किसान रथ वाहतूक सेवा सुरू होत आहे. वेंगुर्ला, मालवण, देवगड, विजयदुर्ग, कुडाळ या आगारांतून आंब्याच्या पेट्या जमा करून त्या पनवेल, वाशी, ठाणे, कुर्ला, परळ, मुंबई सेंट्रल, बोरिवली या आगारांत पोहोचवल्या जाणार आहेत.

चला, महाराष्ट्राची चौफेर ओळख करून घेऊ!

(पान एकवरून)

चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी 'लेट्सरीडइंडिया'चे ट्विटर व्यासपीठ सर्वांसाठी खुले आहे. यामध्ये वाचक पुस्तकांपासून स्वतःच्या लेखांपर्यंत सर्व प्रकारची माहिती देऊ शकतात. या माहितीच्या दस्तावेजीकरणाचेही काम त्यातून होणार आहे. महाराष्ट्राशी संबंधित अनेक विषयांवरील पुस्तकांपासून या विषयांवरील विचार वाचकांपर्यंत पोहोचतील, असा विश्वास 'लेट्स रीड फऊंडेशन'च्या टीमकडून व्यक्त करण्यात आला. या माहितीच्या आधारे नंतर एक बातमीपत्रही तयार केले जाणार असून ते एकत्रित स्वरूपात वाचकांपर्यंत पोहोचवले जाईल. तसेच नंतर 'महाराष्ट्र दिना'च्या निमित्ताने चर्चेत आलेल्या या पुस्तकांचा समावेश 'लेट्स रीड फऊंडेशन'च्या मोबाइल ग्रंथालयांमध्ये केला जाणार आहे. यामुळे ही पुस्तकेही अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचू शकतील.

लष्करातील सहा जणांना दिलासा नाहीच

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

सहकाऱ्यावी हत्या केल्याचा आरोप

आपल्या निवृत्त सहकाऱ्याची हत्या केल्याच्या आरोपाखाली एफआयआर नोंद झाल्याने अटकेच्या भीतीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलेल्या लष्करातील सहा जणांना अटकेपासून संरक्षण देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नुकताच नकार दिला. 'अर्जदार लष्करातील असले, तरी या प्रकरणात पोलिसांकडून कोठडीतील चौकशी आवश्यक आहे. त्यामुळे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात येत आहेत', असे न्या. सारंग कोतवाल यांनी आदेशात स्पष्ट केले.

गणेश ठोकळ यांचा ६ सप्टेंबर २०२० रोजी रायगड जिल्ह्यातील कशिद चौपाटीवर समुद्रात बुडून मृत्यू झाला होता. पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली होती. मात्र, गणेश यांच्या पत्नी रुपाली यांनी त्यांच्या मित्रांवर संशय व्यक्त केल्यानंतर, पोलिसांनी २७ नोव्हेंबर २०२० रोजी हत्येच्या आरोपाखाली भगवान यादव व अन्य पाच मित्रांविरोधात एफआयआर नोंदवला.

'गणेश स्वतःच सहलीला आला होता. तो अचानक बुडू लागला. आम्ही खूप प्रयत्न करूनही वाचवू शकलो नाही', असे आरोपींचे म्हणणे होते. मात्र, 'माझे पती ३१ जुलै २०२० रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर आम्ही अहमदनगरमधील कामगाव येथे रहायला गेलो. तिथे हे सर्व मित्र भेटायला आले होते. त्यावेळी काळा डाग हा शवविच्छेदन वेळच्या जखमेमुळे नसून मृत्यूपूर्वी आघाताने झालेला आहे, असा निष्कर्ष शवविच्छेदन अहवालात आहे. हा वैद्यकीय पुरावा महत्त्वाचा असून सत्य बाहेर येणे आवश्यक आहे', असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

HONDA

25 YEARS Honda in India

10 YEAR ANYTIME WARRANTY

तुम्ही फक्त चालवा, आम्ही सांभाळून घेऊ

अमेझिंग एशुरन्स आहे ना!

AMAZE | THE BIG MOVE

BENEFITS UP TO ₹38 851*

₹14 000 Additional Loyalty Bonus

Exclusive benefits for Government Employees, Pensioners, Select Corporates, Doctors, Finance Professionals, Lawyers, Architects & Teachers. Select models available through GeM & CSD. T&C apply.

Honda From Home | Book online in 5 easy steps. Log on to www.hondacarindia.com | Honda Auto Terrace | Honda ProCARE | 3 YEARS WARRANTY UNLIMITED KILOMETERS | For Corporate and bulk booking please contact rkirolkar@hondacarindia.com

Offers and features are model, fuel type and variant specific. Offers are valid for limited period or till stock lasts. To exchange any existing car with a Honda car, write to autoterrace@hondacarindia.com. Images used are computer generated/enhanced for creative representation purpose and may vary from actual product. *Calculated on Amaze Petrol MT mineral oil cost and coverage of 3 years/30 000 kilometres. #Warranty of unlimited kilometres in a 3-year period from date of sale of new vehicle comes as part of standard purchase. For more details, visit www.hondacarindia.com. Delivery subject to finance and registration only. *Terms and conditions apply.

Hallmark Honda
Nerul: 98331 55000
Thane: 90042 55000 | Panvel: 98332 55000

Regent Honda
Thane: 91361 19380
Kalyan: 88283 38879

Solitaire Honda
Andheri (W): 6151 6151
Borivali: 6151 6151

Viva Honda
Santacruz (W): 4377 7777
Chandivali: 6612 3000

Arya Honda
Prabhadevi: 2422 8686
Bhandup: 2422 8686